शनिवार दि.१ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१३७ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# माझा राजीनामा महत्त्वाचा की,संतोष देशमुखांना न्याय देणे?:भगवानगडावरून धनंजय मुंडेंचा प्रश्न

## गडाच्या पाठीशी असल्याने आत्मविश्वास वाढल्याचा दावा

**माझा राजीनामा महत्त्वाचा की, संतोष देशमुख यांना न्याय देणे महत्त्वाचे? असा प्रश्न मंत्री धनंजय मुंडे यांनी उपस्थित केला आहे. केवळ माझा राजीनामा घेऊन एका समाजाला किंवा मला टार्गेट करायचे असेल तर हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. मात्र, या घटनेत जे गुन्हेगार आहेत, त्यांना फासावर लटकवले गेले पाहिजे, हे माझे पहिल्या दिवसापासून मत असल्याचा दावा देखील धनंजय मुंडे यांनी केला आहे. आरोपाच्या घेऱ्यात अडकलेले धनंजय मुंडे हे कालपासून भगवान गडावर मुक्कामी होते. या दरम्यान गड त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा असल्याचा दावा महंत नामदेव शास्त्री यांनी केला आहे. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड (वृत्तसंस्था)**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात आतापर्यंत जे काही घडले ते सर्वांच्या समोर आलेले आहे. पहिल्या दिवसापासून संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या आरोपींना फासावर लटकवले पाहिजे, ही केस फास्ट ट्रॅक कोर्टात चालवली गेली पाहिजे, ही माझी मागणी आहे. या प्रकरणात जो कोणी दोषी असेल त्यातील कोणालाही सोडू नये, त्यांना शासन झालेच पाहिजे. ही आमची पहिल्या दिवसापासून भूमिका आहे. तरी देखील आजही काही जण राजकारण करत असतील, आणि त्यांचे राजकारण केवळ माझा



राजीनामा घेण्या पुरते आहे की, संतोष देशमुख यांना खरा न्याय देण्यासाठी आहे? असा प्रश्न मुंडे यांनी उपस्थित केला.मंत्री झाल्यानंतर भगवान गडावर दर्शनासाठी आला नव्हतो. त्यामुळे अनेक वर्षानंतर भगवान गडावर मुक्कामी आलो असल्याचे धनंजय मुंडे यांनी सांगितले आहे. मला सकाळी भगवान बाबांचे दर्शन घ्यायचे होते. त्यामुळे मी कालच येथे मुक्कामी आलो होतो. भगवानगड आल्यानंतर एक नवीन ऊर्जा मिळते. भगवान गडावर सकारात्मक वातावरण असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. भगवान बाबांनी माझ्या मागे शक्ती उभी केली असल्याचे देखील धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

### बाबांनी माझ्या मागे शक्ती उभी केली

बाबांनी माझ्यावर पूर्ण विश्वास असल्याचे त्यांनी सांगितले आहे. बाबांनी माझ्यावर एवढा मोठा विश्वास व्यक्त केला की, ही माझ्यासाठी खूप मोठी जबाबदारी असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. संकटाच्या, संघर्षात काळात भगवानगड माझ्या पाठीमागे उभा आहे. याच्याबद्दल नामदेव शास्त्री यांनी वाच्यता केली. ही माझ्यासाठी खूप मोठी शक्ती आहे. या शक्तीचे वर्णन मी शब्दात देखील करु शकत नाही. त्यांनी माझ्या मागे शक्ती उभी केली आहे, तेवढी जबाबदारी देखील माझ्यावर बाबांनी टाकली आहे. मी जातपात, धर्म न पाहता सर्व समाजातील लोकांची सेवा करतो. ती पुन्हा एकदा जबाबदारी त्यांनी माझ्यावर टाकली असल्याचे मुंडे यांनी म्हटले आहे.

### मला टार्गेट करण्याचा प्रयत्न

माझ्यावरील संकट हे काही आज आलेले नाही. गेल्या ५३ दिवसापासून इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडियावर मला टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या मध्ये मी कधीही एक शब्दही बोललेलो नाही. या ५३ दिवसात मला कधीही भगवानगडावर येता आले असते. मात्र त्या भावनेतून येथे आलेलो नाही. आपण मंत्री झालो आहोत, आणि मंत्री झाल्यानंतर मला भगवानगडावर यायचे होते. बाबांचे दर्शन झाले की, शक्ती आणि प्रेरणा मिळते. तीच सर्वसामान्य व्यक्तींसाठी लढण्यासाठी, त्यांचे सेवा करण्यासाठी ताकद देत असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

# एरंडोल नगर वाचनालयाच्या अध्यक्षपदी जगदिशभाऊ ठाकूर,कार्याध्यक्ष पदी प्रा.वा.ना.आंधळे,चिटणीसपदी रवींद्र लाळगे यांची सर्वानुमते निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**एरंडोल । प्रतिनिधी**

येथील १५७ वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेल्या नगर वाचनालयाची आज दि.३० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता सर्वसाधारण वार्षिक सभा संस्थेचे मावळते कार्याध्यक्ष मा.किशोर काळकर यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावान कार्यकर्ते तथा संस्थेचे अध्यक्ष स्व.डॉ.वा.पु.जोशी यांचेसह विविध क्षेत्रातील दिवंगतांना व कुंभमेळ्यात दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या भाविकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यानंतर संस्थेचे ग्रंथपाल संतोष वंजारी यांनी मागील सभेचे प्रोसिडिंग वाचून मंजूर



जगदिशभाऊ ठाकूर



प्रा.वा.ना.आंधळे



रवींद्र लाळगे

केले.सन २०२४–२५ व सन २०२५–२६ या दोन वर्षासाठी सर्वानुमते एरंडोल येथील सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक जगन्नाथ ठाकूर उर्फ जगदीशभाऊ ठाकूर यांची नगर वाचनालयाच्या अध्यक्षस्थानी, तर कार्याध्यक्षपदी खान्देशातील सुप्रसिद्ध साहित्यिक तथा वक्ते प्रा.वा. ना.आंधळे तर चिटणीसपदी निवृत्त शिक्षक तथा लेखक रवींद्र लाळगे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.याचवेळी सहचिटणीस यापदी संतीस वंजारी तर संचालकपदी मा.किशोरभाऊ काळकर, गुरुप्रसाद तुकाराम पाटील, जाधवराव भीमसेन जगताप, प्रवीण आधार महाजन, परेश किशोर बिर्ला, डॉ.प्रेमराज गंगाधर पळशीकर,अमोल अशोक काबरा, रवींद्र प्रभाकर सोनार,सुदर्शन मधुकर देशमुख यांची निवड करण्यात आली.सभेचे संपूर्ण कामकाज ग्रंथपाल देवेंद्र संतोष वंजारी, लिपिक संजय बाळकृष्ण अग्निहोत्री, शिपाई गोकुळ अरुण मोरे यांनी केले. नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करीत माननीय किशोरभाऊ काळकर यांनी बुके देऊन स्वागत केले. खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झालेल्या या सभेत मा.किशोरभाऊ काळकर यांनी यथोचित मार्गदर्शन केले.नवनियुक्त अध्यक्ष जगदीश भाऊ ठाकूर ,कार्याध्यक्ष प्रा.वा. ना.आंधळे यांची मनोगते झाली.आभार प्रदर्शन सहचिटणीस संतोष वंजारी यांनी केले.

# पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार यांचा गौरव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

माळाकोळी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री संजय निलपत्रेवार यांना प्रजासत्ताक दिनाच्या विशेष प्रसंगी, नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना. अतुलजी सावे, माजी मुख्यमंत्री मा.खा. आशोकराव चव्हाण, पोलीस अधीक्षक श्री अबिनाश कुमार तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांच्या हस्ते गौरवण्यात आले.

माळाकोळी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील क्षेत्रात चांगली कामगिरी केल्याबद्दल सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार यांचा विशेष सन्मान करण्यात आला.यावेळी संबंधित मान्यवरांनी श्री निलपत्रेवार यांच्या कार्याची प्रशंसा केली आणि त्यांच्या योगदानामुळे माळाकोळी पोलीस स्टेशनच्या कार्यक्षमतेत सुधारणा झाल्याचे



सांगितले. सर्व सन्माननीय व्यक्तींच्या उपस्थितीत झालेल्या या समारंभाने पोलिस दलातील इतर सदस्यांना प्रेरणा मिळवली आहे. सर्वांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# देशाप्रती निष्ठा असेल तर जबाबदारीही स्वीकारली पाहिजे-गुलाबराजा फुलमाळी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

आपल्याला संविधानाने काही मूलभूत हक्क दिले आहेत तसे आपल्या काही जबाबदाऱ्याही आहेत. देशाप्रति निष्ठा असेल तर स्वतःच्या स्वार्था एवढाच समाजाचा ,देशाचा विचार केला पाहिजे.. ट्राफिक चे नियम पाळणे, अपघातग्रस्ताना मदत करणे, त्सुनामी, अतिवृष्टी, दुष्काळ ग्रस्तासाठी आपण नागरिक म्हणून मदत केली पाहिजे. आपल्या लेकरांवरती संस्कार करण्यात आपण पालक म्हणून कुठेतरी कमी पडतो म्हणूनच आज वृद्धाश्रमाची संख्या वाढते आहे. आपण नैतिक मूल्ये जोपासली तरच पुढची पिढी सक्षम होईल.. असे प्रतिपादन कवी गुलाबराजा फुलमाळी यांनी केले २६ जानेवारी रोजी शिक्रापूर येथील गुरुग्लोबल इंग्लिश मेडिएम प्रि– प्रायमरी स्कूल मध्ये प्रजासत्ताक दिना निमित्त बोलत होते.बाल शाहिद शिरीषकुमार च्या बलिदानाच्या गोष्टीची आठवण करून देत वंदे मातरम चा नारा दिला. प्रमुख अतिथी कवी गुलाबराजा फुलमाळी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून ध्वजरोहण करून राष्ट्रध्वजला सलामी देऊन राष्ट्रगीत घेण्यात आले. संस्थेचे डायरेक्टर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या गीतांवर डान्स केला. वेगवेगळ्या ॲक्टिव्हिटीत गुणवंत ठरलेल्या विध्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. 1st टर्म रिझल्ट डी. घस पहिला क्रमांक – मेघा हिंगेदुसरा क्रमांक – नोमन मन्सूरी,तिसरा क्रमांक –अद्विक कुलकर्णी..गी. घसपहिला क्रमांक –



राजनंदिनी क्षीरसागर ,दुसरा क्रमांक – सक्षम पवार,तिसरा क्रमांक – अर्णव चव्हाण,नर्सरी पहिला क्रमांक – अश्विन हिंगे,दुसरा क्रमांक – पूर्वीका पवार,तिसरा क्रमांक – विराज खराबे प्ले ग्रुप,पहिला क्रमांक – अद्विका गरुड,दुसरा क्रमांक – आरोही गरुड फूड फेस्टिवल – पहिला क्रमांक – आरोही खेडकर,दुसरा क्रमांक – आदेश खराबे,तिसरा क्रमांक – पियुष येवले...सायन्स अबीलिटी ॲक्टिव्हिटी अर्णव चव्हाण आणि आरव पवार... को ओरडनेशन ॲक्टिव्हिटी रुरांश ननवरे आणि वेदांत इंगोले... इनडोअर ॲक्टिव्हिटी सृष्टी दासाडे आणि आरोही गरड... बॉल बॅलन्सिंग ॲक्टिव्हिटी शिव चव्हाण आणि प्रेम जाधव आदी विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले..कार्यक्रमाला खेडकर, गरुड, लोणारी, हिंगे, मन्सूरी, खराबे, मोटे, ननवरे, चव्हाण, जाधव,येवले,पखाले, राक्षे, आहेरकर, पवळे, फड, वायबसे, सपकाळ, बनसोडे आदी पालक उपस्थित होते. चॉकलेट ,बिस्कीटचा खाऊ वाटप करून रवी जगताप सर यांनी आभार मानले.

# ३१ मार्च रोजी मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे होणार बहुजन साहित्य संघाचे संमेलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**



दि. २२ जाने रोजी मातृतिर्थ सिंदखेड राजा येथे नियोजित, बहुजन साहित्य संघ चिखली च्या साहित्य संमेलन २०२५ संदर्भात चौथी बैठक सिंदखेड राजा येथे पार पडली. आयोजित बैठकीमध्ये बहुजन साहित्य संमेलनाची तारीख ब.स. संघाचे अध्यक्ष ॲड. डॉ. विजयकुमार कस्तुरे यांनी घोषित केली आहे. दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरीत बहुजन साहित्य संमेलन पार पडणार असून. या संमेलनासाठी महाराष्ट्रभरातून साहित्यिक येणार असून. साहित्यिकांची मांदियाळी जिजाऊंच्या मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरीत भरणार असून यासंमेलानासाठी सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

बहुजन साहित्य संमेलनाची चौथी बैठक ही डॉ. डी. व्ही. खरात यांच्या अध्यक्षेतेखाली पार पडली असून या बैठकीसाठी ब. स. संघाचे अध्यक्ष ॲड. डॉ. विजयकुमार कस्तुरे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले होते. तर या बैठकीसाठी दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत, संपादक राहुल झोटे, ज्येष्ठ कलाकार बबनराव महामूने, अंकुशराव पडघान हे उपस्थित होते.

# स्नेह संवाद मेळावा व खा.रविद्र चव्हाण यांचा सत्कार संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

भोकर विधानसभेचे नेते श्री तिरुपती उर्फ पप्पु पाटील कोंढेकर यांनी आयोजित केलेल्या भोकर विधानसभा मतदारसंघातील सहकाऱ्यांचा स्नेह सवांद मेळावा व नांदेड लोकसभेचे खा.रविंद्र पाटील चव्हाण यांचा सत्कार सोहळा श्री विठ्ठलराव देशमुख मंगल कार्यालय,पिंपळगाव येथे पार पडला.त्यावेळी नांदेड लोकसभेचे खासदार श्री रवींद्र पाटील चव्हाण,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी




मंत्री मा.माधवराव पाटील किन्हाळकर साहेब,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री भगवानराव पाटील आलेगावकर,काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते,नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक श्री बाबुराव कदम कोंढेकर,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री बबनरावजी बारसे व महाविकास आघाडीचे सर्व तालुकाध्यक्ष,शहराध्यक्ष व पक्षाचे पदाधिकारी तसेच इतर सहकारी मान्यवर व बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# केमिस्ट हृदय सम्राट जगन्नाथ आप्पा शिंदे यांच्या ७५ अमृत महोत्सव वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर संपन्न

## मुखेड तालुका मुक्रमाबादसह केमिस्ट असो.वतीने १२६ बॉटल रक्तसंकलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

मुखेड तालुक्यातील केमिस्ट अँड ड्रगिस्ट असो. वतीने केमिस्ट हृदय सम्राट जगन्नाआप्पा शिंदे यांच्या ७५ व्या अमृत महोत्सव वाढदिवसानिमित्त मुखेड शहरातील राजे शिवछत्रपती अकॅडमी येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. असून या कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला युवा केमिस्ट विश्वजित काळे यांच्या हस्ते पुष्पहार घालून झाली. यावेळी उपस्थित केमिस्ट तालुका अध्यक्ष बाळानंद गबाळे, शिवकुमार बिरादार महेश देशमुख ,राम पाटील राजू टोम्पे सतीश मरवाळीकर उपस्थित होते. त्यानंतर रक्तदान करण्यास सुरुवात झाली प्रथम रक्तदान आमचे प्रथम केमिस्ट राजू एकाळे यांच्यापासून झाली या रक्तदान शिबिरामध्ये तालुक्यातील सर्व फार्मासिस्ट केमिस्ट सहकारी मित्र युवा नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करून सहभाग नोंदवला विशेष म्हणजे या रक्तदान शिबिरामध्ये प्रथमच दोन डॉक्टरांनी रक्तदान करत नवा आदर्श निर्माण केला. त्यामध्ये बालरोग तज्ञ नितीन आंबेकर अस्थिरोग तज्ञ डॉक्टर मुकुल गोपुलवाड, यांचा सहभाग होता. त्याचबरोबर जितेंद्र आव्हाड डी फार्मसी कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी सुद्धा रक्तदान करून शिबिरामध्ये सहभाग नोंदवला, तसेच राजे शिवछत्रपती अकॅडमी येथील संचालक ज्ञानेश्वर डुमणे पाटील त्यांचे विद्यार्थ्यांनी रक्तदान करून, कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले. तालुका केमिस्ट असो. बरोबरच मुक्रमाबाद येथील केमिस्ट मंडळीने उत्कृष्ट कामगिरी करून ३६ बाटल्याचे रक्त संकलन करून एक नवा आदर्श निर्माण केला आहे मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद सह एकूण १२६ बॉटल रक्त संकलन झाले असून त्यामध्ये बाराळी जांब व सर्व सर्कल मधील केमिस्ट आणि फार्मासिस्ट इतर त्यांचे सहकारी नागरिकानी सहभाग नोंदवत रक्तदान केले.तसेच तालुक्यातील रक्तदान शिबिराच्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल मुखेड तालुक्याचे भूमिपुत्र तथा नांदेड जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष शंतनू कोडगिरे यांनी तालुक्यातील सर्व केमिस्ट, फार्मासिस्ट व इतर त्यांचे सहकारी सर्व मित्र परिवारांचे कौतुक करून सर्वांचे विशेष अभिनंदन केले आहे. यावेळी उपस्थित. ज्येष्ठ केमिस्ट फार्मासिस्ट सहकारी मित्रपरिवार व रक्तदान केलेले सर्व रक्तदाते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आमदार राहुल कुल यांनी आयुक्त योगेश म्हसे यांची घेतली भेट

## दौंड तालुक्यातील विविध समस्यांबाबत केली चर्चा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**




पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत दौंड तालुक्यातील समाविष्ट गावातील विविध समस्यांबाबत पीएमआरडीए चे आयुक्त योगेश म्हसे यांची आमदार राहुल कुल यांनी घेतली भेट. यावेळी दौंड तालुक्यातील धार्मिक पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी आराखडा करण्यात यावा, अंतर्गत रस्ते, पार्किंग, पाणीपुरवठा व भाविकांसाठी निवारा शेड उभारण्यात यावेत.

भविष्यातील वाढते नागरिकीकरण व औद्योगिकीकरण लक्षात घेता रिंग रोड, गावातील रस्ते व पुल यांचा एकात्मिक आराखडा तयार करण्यात यावा तसेच नव्याने उभारण्यात.येणाऱ्या पुरंदर अंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडणारे सर्व रस्ते सुसज्ज होतील यासाठी नियोजन करण्यात यावे.दौंड तालुक्यातील सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रासाठी समाविष्ट गावांसाठी क्रीडा संकुल व सांस्कृतिक केंद्र उभारण्यात यावे. राहू व यवत या गावांना अर्बन ग्रोथ सेंटर जाहीर करण्यात आले असून,आवश्यक सर्व भौतिक सुविधा पुरविण्यात याव्यात. पुणे सोलापुर रेल्वे मार्गावरील सुमारे ९६ कोटी रुपयांचे यवत ते राहू दरम्यान मंजुर करण्यात आलेल्या पुलाचे काम सुरु करत्यात यआवे. प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये नवीन लाभार्थ्यांना समाविष्ट करण्यासाठी पुढील प्रकल्प अहवालाचे काम गतीने पूर्ण. करण्यात यावे, मंजुर असलेल्या अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांना विनाविलंब मिळावी. दौंड तालुक्यातील पीएमआरडीए हद्दीतील गावांसाठी स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करून देण्यात यावी.

यावेळी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरनातील सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# उमरज येथे होणाऱ्या १०८ कुंडी विष्णूयाग यज्ञ व कथा मंडप भूमिपूजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



मराठवाड्यातील सुप्रसिद्ध श्री संत नामदेव महाराज मठसंस्थान (धाकटे पंढरपूर ) उमरज ता.कंधार येथे कलशारोहण सोहळ्या निमित्त दि.२७ फेब्रुवारी ते ६ मार्च दरम्यान होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ १०८ कुंडी विष्णू यागयज्ञ या कार्यक्रमाचे ध्वजपूजन, ध्वजारोहण व कथा मंडप भूमीपूजन दि.२ फेब्रुवारी रोजी साधुसंत महंत यांच्या उपस्थितीत श्री क्षेत्र उमरज येथे संपन्न होणार आहे.

मराठवाडा,आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक राज्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्री संत नामदेव महाराज संस्थान श्रीक्षेत्र उमराज ता.कंधार येथे श्री संत नामदेव महाराज मंदिर व विठ्ठल रुक्मिणी मंदिर कलशारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त दि २७ फेब्रुवारी ते ६ मार्च दरम्यान आंतरराष्ट्रीय भागवत कथाकार श्री देवकीनंदनजी ठाकूर श्रीक्षेत्र वृंदावन धाम यांच्या सुमधुर वाणीतून भागवत कथा होणार आहे. दि.४ फेब्रुवारी रोजी जगद्गुरु शंकराचार्य स्वामी यांच्याहस्ते कलशारोहनाचा मुख्य सोहळा होणार आहे. तसेच या सप्ताह दरम्यान १०८ कुंडी विष्णूयाग यज्ञ संपन्न होणार आहे.

या कथा स्थानाचे व यज्ञ स्थानाचे धर्मध्वज पूजन, कथा मंडप भूमिपूजन श्री क्षेत्र उमरज संस्थांचे मठाधिपती श्री संत एकनाथ गुरु नामदेव महाराज व नराशम महाराज येवतीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमाच्या आढावा बैठकीसाठी आमदार प्रताप पाटील चिखलीकर,आमदार डॉ. तुषार राठोड, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मुख्य कार्यकारीधिकारी मिनल करनवाल, प्रशिक्षणार्थी आय.ए.एस.अनुष्का शर्मा, उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, तहसीलदार रामेश्वर गोरे आदी दि.२ फेब्रुवारी रोजी दुपारी उमरज येथे येणार असून या कार्यक्रमास भाविक भक्तांनी मोठ्यासंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मठाधिपती श्री संत एकनाथ गुरु नामदेव महाराज यांनी केले आहे.

# लोणी काळभोर पर्यंत मेट्रो मार्गीकेची आखणी करा : आमदार राहुल कुल

## पुणे जिल्हा नियोजन समितीच्या मीटिंगमध्ये विकास आराखडा मंजूर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । बबनराव धायतोंडे**



पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.या बैठकिमध्ये जिल्ह्यातील विविध विकास कामांच्या समस्यांवर चर्चा झाली. बैठकीस जिल्ह्यातील सर्व मंत्री,आमदार, खासदार,विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी,महानगर पालिका आयुक्त, जिल्हा प्रशासनातील सर्व खात्यांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पुणे जिल्ह्याच्या विकासासाठी आवश्यक विकास आराखड्यास यावेळी मंजूरी देण्यात आली.या माध्यमातून पुण्याच्या ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे असे दौंड चे आमदार राहुल कुल म्हणाले. पुणे–सोलापूर, पुणे–नगर महामार्गवरील वाहतूक कोंडीचे नियोजन करण्यात यावे पुणे सोलापूर महामार्गवरील नियोजित हडपसर ते कासुर्डी दुमजली उड्डाणपूल हा रेस्कोर्स ते चौफुला,ता.दौंड पर्यंत करण्यात यावा आणि लोणीकाळभोर पर्यंत मेट्रो मार्गीकेची आखणी करण्यात यावी. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारतीसाठी संपूर्ण जिल्ह्यात सर्वेक्षण करण्यात यावे,त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात यावी.आदी मागण्या आमदार राहुल कुल यांनी केल्या. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, डॉक्टर निलम गोऱ्हे, खासदार सुप्रियाताई सुळे,आमदार राहुल कुल,आमदार सुनील शेळके यांच्यासह सर्व विभागातील शासकीय अधिकारी उपस्थित होते.

# जे कोणी गुन्हेगार आहेत त्यांना थेट फाशी व्हायला पाहिजे– पंकजा मुंडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड (वृत्तसंस्था)**

सध्या बीड जिल्हा सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे चांगलेच चर्चेत आले आहे. तसेच बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीची चर्चा आता देशपातळीवर होत आहे. वाल्मीक कराडला अटक झाल्यानंतर आता मंत्री धनंजय मुंडे आणि परळी मतदारसंघावर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या सगळ्यावर आता मंत्री पंकजा मुंडे यांनी भाष्य केले आहे.



पंकजा मुंडे यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना बीड आणि परळीतील घटनांबद्दल विचारणा करण्यात आली. त्यावर त्यांनी थेट विधान केले. या घटना सर्वच ठिकाणी घडत आहेत. परळी परळी करु नका. तुमचा फोकस परळीकडे आहे. यात जे कोणी गुन्हेगार आहेत त्यांना थेट फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

पुढे बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, या घटना होऊ नयेत. ही एक प्रवृत्ती आहे. परळी परळी करु नका. प्रत्येक ठिकाणी घटना घडत आहेत. तुमचा फोकस परळीकडे आहे. घटना सर्व ठिकाणी घडत आहेत. माझ्याकडे माहिती आलेली आहे. कोणत्या मतदारसंघात कोणत्या जिल्ह्यात काय घडत आहे, याची संपूर्ण माहिती आहे. कुठेही अशाप्रकारची घटना घडणे चूक आहे. या घटना घडणे चुकीच्या आहेत. यात जे कोणी गुन्हेगार आहेत, त्यांना थेट फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे. त्यांना पकडायला हवे.

# स्वातंत्र्य सैनिक स्मारक व गृह निर्माण संस्थेच्या सर्व अडचणी प्राधान्याने सोडवू–आ.बालाजी कल्याणकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

नांदेड शहरात सर्व सुविधा युक्त उच्चभ्रू वसाहत म्हणून व आदर्श गृह निर्माण संस्था म्हणून ज्या संस्थेकडे पहिल्या जाते त्या स्वातंत्र्य सैनिक गृह निर्माण संस्थेच्या सभासदाच्या वतीने संस्थेच्या मोकळ्या विस्तीर्ण जागेत स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मृतींना उजाळा व प्रेरणा देण्याच्या दृष्टीने स्वातंत्र्य सैनिकांचे स्मारक लोक वर्गणीतून उभे करण्याचे काम चालू आहे या उभारणीच्या कामाचे भूमिपूजन नांदेड उत्तर विधानसभा मतदार संघाचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांचे शुभ हस्ते प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून २६ जानेवारी रोजी करण्यात आले या कार्यक्रमास वैद्यकिय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ सुधीर देशमुख ,मंनपा चे माजी नगरसेवक आनंद चव्हाण ,शिवाजिराव पाटील,अरुण सुकळकर ,संस्थेचे अध्यक्ष डॉ विक्रम देशमुख, उत्तमराव इंगळे, सचिव श्यामराव कानोटे,शिवाजीराव खरबिकार यांची प्रमुख उपस्थिती होती या प्रसंगी संस्थेच्या मालकीच्या जागेच्या अडीअडचणी बांधकाम परवानगी पी आर कार्ड व कॉलनीत राहिलेले रस्ते बांधकाम व सद्य स्थितीत चालू आसलेल्या स्वातंत्र्य सैनिक स्मारक या बाबद शासनाची व जिल्हाधिकाऱ्यांची मदत या बाबद संस्थेचे अध्यक्ष डॉ विक्रम देशमुख व स्मारक समितीचे सदस्य सत्यनारायण आंबेकर यांनी आमदार कल्याणकर यांचेकडे प्रास्तविक भाषणातून केली भूमिपूजन झाल्याची घोषणा करून गृह निर्माण संस्थेच्या वतीने केलेल्या सत्काराला उत्तर



देताना आपण आपल्या सर्व समस्या प्राधान्याने सोडवू बोलण्यापेक्षा कृतीला महत्व देणारा मी आपला लोकप्रतिनिधी आहे आपल्या संस्थेत असलेल्या मंदिराच्या पुढे सभागृह साठी आपण २५ लाखाचा निधी दिला आहे ज्याचे काम प्रत्यक्षात चालू आहे येणाऱ्या काळात स्वातंत्र्य सैनिकाच्या स्मृती चिरकाल स्मरणात रहावा या उद्दात हेतूने आपण सर्व सभासदांनी घेतलेला निर्णय अगदीं स्तुत्य व अभिनंदनीय आहे या पवित्र कामात आपण कुठेही कमी पडणार या स्मारकाला साजेल अशी शासकीय मदत पुढील काळात करू अशी ग्वाही आ. कल्याणकर यांनी दिली या कार्यक्रमात माजी नगरसेवक आनंद चव्हाण यांनी मी खा रवींद्र चव्हाण यांच्या प्रयत्नातून काय सहकार्य करता येईल ते करील असे आश्वासन दिले या कार्यक्रमात गृह निर्माण संस्थेचे रहिवाशी असलेले वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ सुधीर देशमुख यांची नांदेडला वैद्यकिय महविद्यालय येथे अधिष्ठाता म्हणून व संस्थेचे अध्यक्ष डॉ विक्रम देशमुख यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या प्रदेश सरचिटणीस पदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला या कार्यक्रमास शिवाजीराव पाटील बापू दासरी विजयराव देशमुख राजेश्वरराव शिउरकर रवी देशमुख पारडीकर सौ निर्मला जाधव प्रकाश बागडे श्री लूगारे डॉ प्रल्हाद तवर सुधीर पाठक विठलराव पतंगे तातेराव देशमुख बलाजिराव कुऱ्हाडे सौ तारखा कंठाळे निर्मला जाधव तसेच पदाधिकारी मोठ्या प्रमाणात महिला व सभासद उपस्थित होते

# गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे यांच्यामुळे ग्रामीण विदयार्थी घेताहेत स्पर्धा परिक्षेचे धडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे यांच्यामुळे तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेत असलेल्या ग्रामीण विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेला सामोरे जाण्यासाठी सखोल ज्ञानाचे धडे मिळत आहेत अशी प्रतिक्रिया पालक वर्गातून ऐकावयास मिळत आहे.आजच्या आधुनिक काळात दर्जेदार शिक्षणाच्या नावाखाली शहरी भागासह ग्रामीण भागातील पालकांचाही इंग्रजी शाळेकडे कल वाढला आहे. परिणामी जिल्हा परिषदेच्या शाळेतील पटसंख्या झपाट्याने कमी झाल्याने त्यांना उत्तरती कळा लागली असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. अशा परिस्थितीत जिल्हा परिषदेच्या सरकारी शाळेतील विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकून राहावा, इंग्रजी शाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणेच ग्रामीण विध्यार्थीही सरस ठरावा, याच प्रमुख उद्देशाने गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे, शिक्षक विस्तार अधिकारी सुमन गोणारकर यांनी तालुक्यातील काही गुणवान आणि धडपडया गुरुजींना सोबत घेऊन भोकर तालुक्यात शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करण्यासाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबवित आहेत.

भोकर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या १२५ शाळा कार्यान्वीत असून या शाळेत सुमारे २५ हजार गोरगरिबांची लेकरं शिक्षण घेत आहेत. सर्व साधारणपणे ग्रामीण भागातील सर्वांगीण विकासाचा पाया ठरलेली ही हक्काची सरकारी शाळा कथित दर्जेदार शिक्षणाच्या अट्टहासापायी दुर्लक्षिली जात आहे. या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अंगावर भरजरी वस्त्र नाहीत किंवा त्यांना खाजगी शिकवणी वर्गाला जाण्याची सोय नसते, म्हणून काय ते शिकू शकत नाहीत? या भंपक बाजीला तस्सुभरही प्राधान्य न देता,ग्रामीण भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे यांनी एक नवी उमेद घेऊन जीवाचे रान करताना दिसत आहेत.. तत्कालीन गटशिक्षणाधिकारी एम.जी वाघमारे यांच्या सेवानिवृत्तीनंतर सप्टेंबर २०२४ मध्ये रुजू झालेले सुधीर गुट्टे हे खऱ्या



अर्थाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी नवी पहाट घेऊन अवतरले आहेत. सदरील उपक्रमासाठी शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, केंद्रीय मुख्याध्यापक व शिक्षकांशी सुसंवाद, समन्वय साधून कार्य करीत आहेत.

इयत्ता पाचवी व आठवीसाठी असणारी शिष्यवृत्ती परीक्षा अगदी समीप येऊन ठेपली आहे. गटशिक्षणाधिकारी गुट्टे यांच्या अभिनव संकल्पनेतून मौजे पाळज येथे दिनांक २७ जाने ते ०१ फेब्रुवारी या कालावधीत संकल्प निवासी शिष्यवृत्ती परीक्षा पूर्व सराव वर्गाचे आयोजन करून पूर्णत्वास नेण्यासाठी अखंड मेहनत करत आहेत.नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी मागील काळात शाळा स्तरावर शिक्षक बांधवांशी समन्वय साधत,अतिरिक्त तासिक घेउन नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेची जोरदार तयारी करून घेतली होती. दरम्यान शाळा स्तरावर परीक्षा घेऊन त्यात अनुक्रमे प्रथम, द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांची केंद्रस्तरावर परीक्षा घेऊन केंद्रात अनुक्रमे प्रथम,द्वितीय, तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांची तालुकास्तरावर परीक्षा घेण्यात आली. यात गुणानुक्रमे टॉप आलेल्या इयत्ता पाचवीच्या ३४ तर इयत्ता आठवीच्या २० असे एकुण ५४ विद्यार्थ्यांसाठी मौजे पाळज येथील श्रीक्षेत्र गणपती मंदिराच्या परिसरात ट्रस्टची मदत घेऊन, दिनांक २७ जाने ते ०१ फेब्रू या कालावधीत निवासी सराव वर्ग चालू करण्यात आले. याठिकाणी सराव अभ्यास वर्गाचे अतिशय सुरेख नियोजन करण्यात आले असून, विद्यार्थ्यांकडून गणित, बुद्धिमत्ता भाषा आदी विषयाच्या प्रश्नपत्रिका सोडवून घेणे, त्यानंतर त्या प्रश्नपत्रिकेस अनुसरुन तज्ञ शिक्षक बांधवांकडून मार्गदर्शन करणे,परिक्षा घेणे,डाऊट सेशन मध्ये विद्यार्थ्यांच्या शंखेचे निरसन केले जात आहे. या निवासी अभ्यास वर्गाचा आज ०४ था दिवस उलटला.काही पालक न राहवता विद्यार्थ्यांना भेटण्यासाठी आले असता येथील निर्माण झालेले शैक्षणिक वातावरण बघून अक्षरशः भारावून जाताना शिक्षण विभाग व श्रीक्षेत्र पाळज गणेश मंदिर ट्रस्टचे जाहीर आभार मानले आहेत. जिल्हापरिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना या दर्जाचे शिक्षण मिळत असेल तर येणारा काळा गरीब विद्यार्थ्यांना वरदान ठरणार आहे. रात्रंदिवस मेहनत करणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे भोकर तालुक्यात शिक्षण क्षेत्राला चांगले दिवस नक्कीच येतील असा आशावाद व्यक्त करतांना गटशिक्षणाधिकारी गुट्टे साहेब औक्षवंत व्हावेत, साहेबांकडून हाती घेतलेल्या उपक्रमास यश मिळावे यासाठी पालक वर्गाकडून गणरायास साकडे घालण्यात आले आहे.

# उर्ध्व पैनगंगा प्रकल्पना कार्यालयना अधीकारी–कैलासभाऊ गोरठेकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

कै. बापूसाहेब देशमुख गोरठेकर यांच्या आमदारकीच्या काळात त्यांच्या अथक प्रयत्नामुळे शासनाने या भागाच्या शेती सिंचनासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला. इसापूर धरणातून या भागाला पाणी येते,मात्र अधिकारी प्रशासनाच्या दुर्लक्षितपणामुळे अलीकडच्या काळात उमरी तालुक्यातील शेतीला पाणी मिळत नाही,ही बाब अत्यंत गंभीर आहे. संबंधित खात्याने याची गांभीर्याने



दखल घेऊन उपाययोजना करावी. अन्यथा शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नासाठी आंदोलन उभारावे लागेल, असा इशारा नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक कैलासराव देशमुख गोरठेकर यांनी दिला आहे.

सदर,उमरी उर्ध्व पैनगंगा प्रकल्प अंतर्गत उमरी तालुक्यातशेकडो एकर जमीन सिंचनाचे क्षेत्र असताना उमरी या तालुक्याच्या ठिकाणी मात्र या विभागाचे कोणतेही कर्मचारी किंवा अधिकारी व कार्यालय नसल्याने शेतकऱ्यांनी आपल्या समस्या कुणाकडे मांडाव्या हा प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या पंधरा वर्षांपूर्वी तालुक्यात जवळपास ४५० कोटी रुपये खर्चून उर्ध्व पैनगंगा प्रकल्प अंतर्गत कालव्यांची कामे झाली. गोरठा शिवार ते वाघाळापर्यंत एक प्रमुख बोगदा तयार करण्यात आला. यवतमाळ व हिंगोली जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या ईसापूर गाव शिवारात असलेल्या धरणाचे पाणी उमरी तालुक्यासाठी आणले. जवळपास १५ ते १७ वर्षानंतर आता सिंचन कालव्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे.कामाच्या सुरुवातीलाच मुख्य कालव्यांचे पाणी शेतीला जाण्यासाठी छोटे कालवे वितरिका करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे अजूनही शेकडो एकर शेतीला अद्याप या पाण्याचा कसलाच लाभझाला नाही.तालुक्यातील तळेगाव शिवारात अनेक कालव्यातून पाणी थेट गोदावरी नदीला खांडसरी येथून जाणाऱ्या कालव्याला करण्यात आल्या नाहीत.त्यामुळे शेतीला पाणीच मिळत नाही, हे पाणी नागठाणा, तळेगाव, बेलदरा, हातनी, महाटी मार्गे गोदावरी नदीत जाते. सद्यस्थितीत कालव्यातील के झाडी झुडपे तसेच सिमेंटीकरण फुटल्याने शेतीला पाणी मिळत नाही. जामगाव, गोरठा मायनर मधून येणारे पाणी थेट गोदावरी नदीत जाते. याकडे संबंधित वरिष्ठांचे पूर्णतः दुर्लक्ष आहे. शेतकऱ्यांनी याबाबत तक्रार करावी तर कोणाकडे हाही एक प्रश्न आहे या प्रकल्पाची सर्व कार्यालय नांदेडला असल्याचे सांगण्यात येते. उमरी तालुक्यात एवढ्या मोठ्या प्रमाणावर सिंचन क्षेत्र असताना येथे एकही कार्यालय असू नये.ही एक आश्चर्याची बाब ठरली आहे.

# मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सेलू येथे आयोजित पत्रकार मेळाव्यास उपस्थित राहावे

## जालना जिल्हा मराठी पत्रकार संघाचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

मराठी पत्रकार परिषद मुंबई, परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघ व सेलू तालुका मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि पत्रकार मेळावा दि. १ फेब्रुवारी रोजी परभणी जिल्हयातील सेलू येथे आयोजित केला आहे. या मेळाव्यास जालना जिल्हयातील पत्रकार बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन जालना जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

हा पुरस्कार सोहळा आणि पत्रकार मेळावा सेलू येथील साई नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेला आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे राहणार आहेत. या कार्यकमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून परभणी जिल्हयाच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, उपाध्यक्ष गोपी लांडगे, गणेश मोकाशे,हेमंत वनजू, अविनाश भांडेकर, चंद्रकांत बरदे, विभागीय सचिव दिपक कैतके, पी.पी. कुलकर्णी, रवी उबाळे, प्रदिप घुमटवार, शिखरचंद बागरेचा, मनोज खांबे, सचिन शिवशेट्टे, अमोल खरे, चंद्रकांत क्षीरसागर, राज्य प्रसिध्दी प्रमुख संदीप कुलकर्णी, सहायक राज्य प्रसिध्दी प्रमुख भरत निगडे, राज्य महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डीजीटल मिडिया परिषदेचे राज्यप्रमुख अनिल वाघमारे, डीजीटल मिडिया परिषद कार्याध्यक्ष सनी शिंदे, डीजीटल मिडिया प्रमुख परिषद उपाध्यक्ष अनिल उंबरकर आदींची प्रमूख उपस्थिती राहणार आहे.

या मेळाव्यास जालना जिल्हयातील पत्रकार बांधवांनी सेलू येथे सकाळी ९.३० वाजता उपस्थित राहून परिषदेने आयोजित केलेल्या एकता रॅलीत सहभागी व्हावे, असे आवाहन जालना जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष फकिरा देशमुख, कार्याध्यक्ष किशोर आगळे, उपाध्यक्ष दिनेश जोशी, अभयकुमार यादव, जिल्हा सरचिटणीस नारायण माने, कोषाध्यक्ष धनसिंह सूर्यवंशी, सहसचिव शेख मुसा, जिल्हा कार्यकारिणी सदस्य मोहनराव मुळे, सर्जेराव गिरे, राजकुमार भारूका, गणेश औटी, संतोष सारडा, धनंजय देशमुख, अशोक शहा यांनी केले आहे.

# शेतातील दोन महिन्यांच्या ऊसाची कतीने कापुन पन्नास हजार रुपयांचे आर्थिक नुकसान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । किशन गायकवाड**

उमरी किशनराव सटवाजी गायकवाड रा कुदळा ता उमरी जि नांदेड येथील शेत जामगाव हाधीतील गट क्रं १९७ क्षेत्र ०.४० हे. मध्ये लागन केलेला दोन महिन्यांचा ऊस दि ३०/०२/२५ रोजी कतीने कापुन अंदाजे पन्नास हजार रुपयांचे आर्थिक नुकसान केले आहेत. दि ३१ जानेवारी रोजी सकाळी पोलिस निरीक्षक उमरी यांनी घटनास्थळी भेट दिली असून पुढील तपास बिट जमादार सिंधी गोविंद शिंदे यांच्या कडे दिलेला आहे.

# लोहा पंचायत समितीचे घरकुल विभाग प्रमुख दिनेश तेलंग यांचा सीईओ करणवाल यांच्या हस्ते सन्मान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा पंचायत समितीने पंतप्रधान आवास योजना, रमाई घरकुल योजना व अन्य योजनेची गरजवंत याना लाभ मिळवून देत त्या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्याबद्दल लोहा पंचायत समितीचे घरकुल विभाग प्रमुख दिनेश तेलंग यांचा प्रजासत्ताक दिनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल याच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी प्रकल्प संचालक डॉ संजय तुबाकले यांची



उपस्थिती होती.

लोहा पंचायत समितीच्या घरकुल योजनेचे प्रमुख दिनेश तेलंग यांनी घरकुल योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. गरजवंताला घर मिळावे तसेच योजनेच्या नियमांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी त्याचे प्रयत्न केले आहेत. गटविकास अधिकारी डी के आडेराघो याच्या मार्गदर्शनाखाली पंतप्रधान आवास योजना, रमाई योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळावा यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची दखल वरिष्ठांनी घेतली आहे. त्यामुळे प्रजासत्ताक दिनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल याचा हस्ते दिनेश तेलंग यांना सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले आहे. यावेळी प्रकल्प संचालक डॉ संजय तुबाकले याची उपस्थिती होती. या सन्माना बद्दल गटविकास अधिकारी आडेराघो यासह विस्तार अधिकारी कर्मचारी मित्रपरिवार यांनी दिनेश तेलंग याचे अभिनंदन केले आहे.

# प्रा.हणमंत हांडे यांनी रेखाटलेले भव्य चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माधव बैलकवाड । नायगाव**

नायगाव शहरातील शरदचंद्र महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुखचे प्रा.हनुमंत हांडे यांनी देश विदेशातील नामांकित व्यक्ती, राजकीय,बॉलीवूड ,थोर विचारवंत,साहित्यिक, कवी, गायक यांचे पेन्सिल स्केचने हुबेहूब असे जवळपास २०० चित्र रेखाटलेल्या चित्र प्रतिमेचे प्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ.शंकर विभुते यांच्या हस्ते तर शरदचंद्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. हरिबाबु, प्रोफेसर बलभीम वाघमारे,उपप्राचार्य एच एम पाटील,प्रोफेसर श्रीरंग वट्टमवार या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्राध्यापक हनुमंत हांडे यांना गेल्या अनेक वर्षांपासून हस्तकलेची आवड असल्याने त्यांनी तालुक्यातील मौजे शेळगाव छत्री येथे राहत असताना आपल्या अंगातील सुप्त गुणामुळे त्यांनी गावातील सर्व भिंती बोलक्या केल्या होत्या, आपला छंद त्यांनी पुढे नेत पेन्सिलने पांढऱ्या ड्रॉईंग कागदवर जगातील थोर विचारवंत कार्ल मार्क्स, लेनिन, अब्राहम लिंकन या जगप्रसिद्ध विचारवंतसह देशातील राष्ट्र महापुरुष महात्मा बसवेश्वर, छ.शिवाजी महाराज, महाराणी अहिल्यादेवी होळकर, महात्मा फुले,सावित्रीबाई फुले, संत गाडगेबाबा, राजर्षी शाहू महाराज, मुक्ता साळवे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे यासह राजकीय नेते मंडळी व पार्श्वगायिका लता मंगेशकर महान गायक मोहम्मद अजीज अभिनेता नाना पाटेकर या कलावंतासह पु ल देशपांडे प्र.के. अत्रे, मंगेश पाडगावकर, बहिणाबाई चौधरी अशा सर्व क्षेत्रातील जवळपास दोनशे प्रतिमेचे चित्र रेखाटून त्या प्रतिमेच्या बाजूला त्यांचा अल्पशा परिचय देखील दाखवण्यात आला.शरदचंद्र महाविद्यालय येथे आयोजित केलेल्या भव्य चित्र प्रदर्शन व व्याख्यान हा कार्यक्रमांचे मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त आयोजन केले होते या कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी हनुमंत हांडे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिले प्रारंभी प्रस्तावना डॉ.गो.रा.परडे यांनी मांडली तर कार्यक्रमांचे सूत्रसंचालन प्रा.बालाजी गायकवाड यांनी तर आभार प्रा.वृंदावन नामवाडे यांनी मानले यावेळी कार्यालयीन अधीक्षक प्रशांत बिलवणीकर, प्रा.संजय भालेराव, डॉ. एम एम शिंदे, डॉ. शैलेश कांबळे यासह अनेकांची उपस्थिती होती सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कु. शितल जोडवाड,कु. प्रतीक्षा गिरी,कु. तेजश्री कानोले,कु. वैष्णवी गिरी या विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले आहे.



**दिल्ली येथील येत्या २१ ते २३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन येथे प्रा. हनुमंत हांडे यांनी रेखाटलेले चित्र प्रदर्शन भरविण्यास आयोजकाची परवानगी मिळालेले अर्ज प्राप्त झाले आहे.**

# विमानगरच्या ‘त्या’ घटनेनंतर महिलांच्या सुरक्षेसाठी पुणे पोलिसांकडून नियमावली जारी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

विमाननगर परिसरातील खासगी कंपनीत काम करणार्या तरुणीचा तिच्याच सहकार्याने धारदार शस्त्राने वार करून खून केला. त्या पार्श्वभूमीवर कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलिसांनी कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.याबाबत पोलिसांकडून एक मार्गदर्शिका (एसओपी) तयार करण्यात आली असून, तिचे पालन करणे सर्व कंपन्यांना बंधनकारक असणार आहे. एवढेच नाही, तर मार्गदर्शिकेचे पालन होते की नाही याची खात्री वेळोवेळी पोलीस करणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली आहे. येथील आयटी कंपन्यांमध्ये काम करणार्या महिलांची संख्या मोठी आहे. दिवस आणि रात्रपाळी अशा दोन सत्रात या कंपन्यांचे कामकाज चालते. अनेक आयटी कंपन्यांकडून महिलांना प्रवासासाठी कार आणि बस सेवा उपलब्ध करून दिली जाते. दरम्यान, मागील काही वर्षांपूर्वी जोती कुमारी, नयना पुजारी या आयटी अभियंत्या तरुणींवर अत्याचार करून खून झाल्याच्या घटना घडल्या होत्या.

दहा किंवा अधिक महिला काम करत असलेल्या ठिकाणी महिलांची सुरक्षा आणि समस्या निराकरणासाठी एक अंतर्गत समिती अनिवार्य. त्या समितीमध्ये व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, महिला कर्मचारी आणि सुरक्षेसाठी नियुक्त असलेल्या अधिकार्याचा समावेश असावा.एखाद्या कंपनीत



महिला कामगारांची संख्या जास्त असेल त्यांचे सुरक्षा ऑडिट स्थानिक पोलिस ठाण्यांच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना करावे लागणार. पोलीस निरीक्षक, चौकी प्रभारी अधिकारी आणि एचआर व सुरक्षा प्रमुख यांचे व्हॉटस अॅप ग्रुप तयार करावे लागणार. भौतिक सुविधा, आपत्कालीन प्रतिसाद प्रोटोकॉल कर्मचार्यांची जागरूकता या कार्यक्रमाचे आयोजन महत्त्वाचे.प्रवेशाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य, अंधार असलेल्या गल्ल्या, पार्किंगची जागा या ठिकाणी पोलिसांकडून अचानक तपासणी होणार.कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षेबाबत जलद आणि सुलभ संवाद व्हावा यासाठी कंपनी सुरक्षा प्रमुख आणि एचआर यांचा व्हॉटस्अप ग्रुप. पोलीस तेथे कसा प्रतिसाद दिला जातो याची खात्री करतील. महिला वर्ग अधिक असलेल्या कंपन्यांची माहिती गुन्हे शाखेने घेण्यास सुरुवात केली आहे. माय सेफ पुणे अॅपचे क्युआर कोड येथे लावण्यात येणार असून, बीट मार्शल नियमित येथे गस्त घालतील.स्थानिक पोलीस ठाण्याकडून कंपनीत सीसीटीव्ही कॅमेर्यांची पाहणी केली जाईल. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून जेथे कॅमेर्याची आवश्यकता आहे, अशा ठिकाणी कॅमेरे बसवण्याच्या सूचना करतील. प्रवेशद्वार, बाहेर पडण्याचा मार्ग, पार्किंग परिसर यावर विशेष लक्ष.कंपन्यांकडून पुरविण्यात येणारी प्रवासी सेवा याचे नियमित ऑडिट करावे लागणार. यामध्ये चालकांची पार्श्वभूमी, वाहनांची देखभाल आणि जीपीएस ट्रॅकिंग प्रणालीचा समावेश करावा लागणार.महिला कर्मचार्यांच्या चिंता आणि भीतीचे मूल्यांकन करण्यासाठी विशेषतः रात्री उशिरा प्रवासाबाबत संवाद सत्रे आयोजित केली जातील.

# युवकांनी निरोगी आयुष्य जगावे आ.संतोष पा.दानवे यांचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

युवकांनी व्यसनाकडे न जाता निरोगी आयुष्य जगावे, असे आवाहन आमदार संतोष दानवे यांनी केले. भोकरदन तालुक्यातील सेलूद येथील नवचैतन व्यसनमुक्ती केंद्रात आमदार संतोष दानवे यांच्या हस्ते संतश्रेष्ठ गजानन महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर आमदार संतोष दानवे यांच्या नवचैतन्य व्यसनमुक्ती केंद्राच्या वतीने त्यांचा जाहीर सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आ. संतोष दानवे यांनी आपल्या भाषणामध्ये आमदार संतोष दानवे यांचे आवाहन नवचैतन्य व्यसनमुक्ती केंद्रामध्ये व्यसन करणाऱ्या युवकांना चांगले धडे देऊन व्यसनापासून दूर करीत असल्याने



ज्ञानेश्वर माऊली शेलुदकर यांचे भरभरून कौतुक करण्यात आले. व्यसनाचे अनेक दुष्परिणाम समाजामध्ये पाहायला मिळतात. व्यसनामुळे युवकाची तेजस्विता नष्ट होत आहे. तत्परता संथ होत आहे. व्यसनांमुळे अनेक कुटुंबे उद्धस्त होत आहेत. अनेकांना दारिद्र्याने पिडले आहे. दारू विकणाऱ्यांच्या घरांचा मात्र लिलाव होतो आहे. अनेक रोगांना बळी पडून व्यसनाधीन माणसांना अकाली मृत्यू येत आहे. व्यसनांपासून दूर असलेल्यांना अधिक दूर ठेवणे गरजेचे असल्याचे आमदार दानवे म्हणाले. यावेळी तालुकाध्यक्ष गणेश ठाले, सपोनि संतोष माने, नंदकुमार गिरे, विनोद मिरकर, राजेंद्र देशमुख, कैलास पाचगे, स्वाती कनेर, गायत्री सावजी, संरपच शरद बारोटे यांची उपस्थिती होती.

# प्रधान सचिव श्रीमती राधिका रस्तोगी यांनी घेतले श्री रेणुका मातेचे दर्शन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीक्षेत्र माहूर । राजकिरण देशमूख**

राज्य शासनाच्या प्रधान सचिव अपील व सुरक्षा गृह विभाग तथा राज्याच्या पालक सचिव श्रीमती राधिका रस्तोगी यांनी दि ३० रोजी माहूर गडावर येऊन श्री रेणुका माता मंदिरात दर्शन घेत महाआरजी केली यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा श्री रेणुका देवी संस्थानच्या सचिव मेघना कावली धर्माबादच्या उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे तहसीलदार किशोर यादव यांचे सह विश्वस्त चंद्रकांत भोपी संजय कान्नव यांचे सह पुजारी मंडळाकडून त्यांचा हृदय सत्कार करण्यात आला.

राज्याच्या प्रधान सचिव श्रीमती राधिका रस्तोगी ह्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शंभर दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत नांदेड जिल्हा दौऱ्यावर असून या दौऱ्यात



सुशोभीकरणाची कामे पर्यटन विकास जिल्हा विकास आराखडा यासह इतर विकास कामांच्या पाहणी दौऱ्यातून वेळ काढत त्यांनी दि ३० रोजी माहूर गडावरिल श्री रेणुका माता मंदिरावर येत येथे श्री रेणुका मातेचे दर्शन घेऊन महाआरती केली यावेळी विश्वस्त मंडळ तसेच पुजारी मंडळाकडून त्यांचा हृदय सत्कार करण्यात आला.यावेळी प्रधान सचिव श्रीमती राधिका रस्तोगी यांनी माहूरगडावर सुरू असलेल्या लिफ्ट आणि स्काय वॉक च्या कामांची पाहणी केली तसेच सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे तहसीलदार किशोर यादव यांचे सह उपस्थित विश्वस्तासोबत विकास कामाबाबत चर्चा करून माहिती घेतली यावेळी सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली धर्माबादच्या उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे तहसीलदार किशोर यादव विश्वस्त चंद्रकांत भोपी संजय कान्नव यांचे सह विश्वस्त आणि पुजार्यांनी त्यांचा हृदय सत्कार केला

# कृषी विज्ञान केंद्रातील प्रात्यक्षिके पाहून वावर है तो पावर है याची प्रचीती होते–मेघनाताई बोर्डीकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

देशातील शेतीचा विकास झाला पाहिजे, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. येथील कृषी विज्ञान केंद्र शेतकऱ्यांना शेतीतील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान पोहोंचविण्यासाठी सातत्याने प्रत्यन करित असून शेतीमध्ये महिलांचे मोठे योगदान असल्याने येथे महिला विकासाचाही प्रामाणिक प्रयत्न केला जात आहे. कृषी विज्ञान केंद्रातील पिक प्रात्याक्षिके पहिल्यास वावर है तो पावर है याची प्रचीती होते असे महिला व बालविकास विभागाच्या राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर म्हणाल्या. सगरोळी तालुक्यातील बिलोली येथील कृषी विज्ञान केंद्रातर्फे आयोजीत कृषी तंत्रज्ञान महोत्सवात गुरुवार दि.३० जानेवारी रोजी महिला मेळाव्यास



त्यासंबोधित करीत होत्या.

यावेळी विधान परिषदेच्या सदस्या तथा भाजपाच्या महिला आघाडी प्रमुख चित्राताई वाघ, प्रणीताताई देवरे चिखलीकर, उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे, उद्योजिका चंद्रिका चव्हाण, स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्रियंका भालेराव, कर्करोग तज्ञ डॉ. सुप्रिया सोनजे, प्रा. प्रज्ञा कुलकर्णी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रंगारी उपस्थित होत्या.

कृषी क्षेत्रात ड्रोनचा वापर मोठ्या प्रमाणात होणार असून ड्रोन पायलट बनण्याची संधी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपलब्ध करून दिली आहे. अशा अनेक योजना केंद्र व राज्य शासनातर्फे राबविल्या जात आहेत त्यातून महिला आत्मनिर्भर, सक्षम व आरोग्यमय होतील याची खात्री असल्याचे बोर्डीकर म्हणाल्या.

आमदार चित्राताई वाघ यांनी, हर घर शौचालय व लखपती दीदी अशा योजनांचा महिलांनी लाभ घ्यावा. नावासमोर आईचे नाव जोडून शासनाने महिलांचा सन्मान केला आहे. कौटुंबिक अत्याचार रोखण्यासाठी (११२) डायल करावा असे आवाहन केले. शासनाने लखपती दिदिसाठी अकरा कोटी तर बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी दहा हजार कोटी निधीची तरतूद केली असल्याचे सांगितले. महिलांनी उभारलेल्या प्रदार्शनींना भेटी देऊन संवाद साधला. चंद्रिका चव्हाण यांनी महिलांसाठी उद्योगाच्या संधी, डॉ भालेराव यांनी स्त्रियांचे आरोग्य व डॉ. सोनजे यांनी कर्करोग निदान व उपचार तर प्रा. कुलकर्णी यांनी, निरामय, निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली याचा कानमंत्र दिला. यावेळी यावेळी परिसरातील हजारो महिलांची उपस्थिती होती.

# त्रिमूर्ती माध्यमिक विद्यालयात आनंदनगरी उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिराढोण । दौलत पांडागळे**

दि.३१ जानेवारी रोजी त्रिमूर्ती माध्यमिक विद्यालय उस्माननगर येथे आनंदनगरी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या आनंदनगरीचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक श्री शिवसांब कोरे सर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक व शाळेतील शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.या आनंदनगरीमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी ३५ स्टॉल उभे करण्यात आले त्यामध्ये वेगवेगळे फ्रुट्स,खिचडी भजे,जिलबी,वडापाव, वटाने, भाजलेल्या शेंगा, भेळ, टरबूज, अननस, पाणीपूरी, खोबर लाडू, पापड, चिवडा, गुलाबजामून, शिरकुंभा ,समोसे, अशा पद्धतीचे वेगवेगळे खाद्यपदार्थ विक्रीसाठी उभारण्यात आले याचा गावातील व शाळेतील सर्वच खव्वयांनी मनसोक्त आनंद घेतला .हा



कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक कोरे सर, शिक्षक जाधव सर, चिवडे सर, डांगे मॅडम, दौलत सर, धानोरकर सर, अनमवाड मॅडम, शेटकर मॅडम, जमदाडे सर, पठाण सर, तसेच शिक्षकेतर पांडागळे बी. एच,हणमंत घोरबांड, काशिम शाहा आदींनी यांनी परिश्रम घेतले .

# दिपभारती मा.व उच्च मा.विद्यालय माहोरा येथे बालकांचा जल्लोष या वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

सम्राट अशोक शिक्षण संस्था भोकरदन संचलित, दीपभारती मा व उच्च मा विद्यालय माहोरा येथील शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव श्री दीपक भैय्या सदाशिवे हे प्रमुख उदघाटक म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी बोलतांना म्हनाले की, विद्यार्थांच्या सर्वांगीण विकासासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून मुलांमध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव दिला. यामुळे विदयार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास होतो. तर विद्यालयाचे प्राचार्य श्री पांडे सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमात देशभक्ती पर, धार्मिक, समाज प्रबोदन पर गीत सादर केले. देश मेरा रंगीला, मेरे माँ के बराबर कोई नहीं, एकच राजा इथे जन्माला, व संविधानाच पुस्तक हातात, इत्यादी गाण्यावर नृत्य सादर केले. या कार्यक्रमाला श्री भाऊसाहेब पाटील जाधव, कृषी सभापती जाफ्राबाद,श्री गजानन पाटील लहाने सरपंच माहोरा, केंद्र प्रमुख श्री सोनुने सर, श्री गजानन पाटील जाधव सरपंच कोल्हापूर,श्री भाऊसाहेब पाटील गाढे, सरपंच, वरुड, संजय आव्हाड सरपंच, वडाळा समाधान सोळंके उपसरपंच वडाळा,दिनकर रोडगे, शालेय समिती अध्यक्ष वरुड, सुनील पाटील कुदर शालेय समिती अध्यक्ष, बोरगाव, शामराव पाटील पंडित, शालेय समिती अध्यक्ष, कोल्हापूर.श्री कर्वे सर प्राचार्य दिपभारती विद्यालय, वढोद तांगडा, श्री कासार सर मुख्याध्यापक, लुबिनी विद्यालय, कुंभारझरी, श्री गवळी सर, प्राचार्य, दिपभारती विद्यालय, दानापूर. श्रीमती पुजाताई सदाशिवे.श्री पी टी दाभाडे सर.श्री शिंदे मामा, सामाजिक कार्यकर्ते, श्री बोरसे मामा, सामाजिक कार्यकर्ते, श्री गडकरी अण्णा सामाजिक कार्यकर्ते,हे उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीमती. गोलटगावकर व श्री दाभाडे यांनी केले, तर आभार श्री गोराने सर यांनी व्यक्त केले. श्री लोढे सर, श्री सोन्ने सर,श्री शिंगाडे सर, श्री पैठने सर, शेजूळ सर, पगारे मामा, व भिंगारे मामा, मोनू गडकरी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.




हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904